# खेळताना खरचटले तर..!

एकदा काय झाले –
रमा, सखू आणि जना खेळत होत्या.
रमा लंगडी घालत होती.
रमा सखूला पकडणार इतक्यात –



सखूचा पाय घसरला, ती पडली.
सखूला खरचटले. सखूच्या गुडघ्यातून रक्त आले.
खेळ थांबला.



© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई-४०० ००५.
प्रकाशक : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
पुणे-४११०२९.



रमा म्हणाली, "थांब ! घाबरू नकोस. आता बरे वाटेल तुला !"
रमाने थोडीशी माती घेतली व हळूच सखूच्या पायावर सोडली. सखू बसून राहिली. खेळ चालू झाला.

थोड्या दिवसांनी सखूच्या जखमांवर खपली धरली. सखूला वाटले जखम लवकरच बरी होणार.



पण सखूचा पाय ठणकत होता. खपलीच्या बाजूला थोडे सुजले. खपलीजवळ खाज येऊ लागली.

सखूने नखाने खाजवले. जखमेवरची खपली काढली. जखमेतून पांढरा पू आला. नखांनी जखमेजवळ ओरखडे उठले.



सखूचा पाय बरा होईना.
सखूच्या बाबांनी सखूला दवाखान्यात नेले.



डॉक्टरांनी जखम स्वच्छ पाण्याने धुतली.
पांढऱ्या फडक्याने कोरडी केली.
जखमेला औषध लावले.

डॉक्टर म्हणाले, " जखमेवर माती टाकली हे चुकले. मातीत बारीक जंतू असतात. जखमेतून ते आत गेले. वाढलेल्या नखात घाण माती जमते. नखांनी जखम खाजविली की ती घाण जखमेतून आत जाते. मग जखम चिघळते."



कापले, खरचटले तर जखम स्वच्छ पाण्याने धुवा. स्वच्छ कापडाने पुसा. जखम लहान असेल तर हळद लावून पट्टी बांधा. मोठी असेल तर दवाखान्यात जा.

जखमेवर माती टाकू नका. जखम धुण्यासाठी स्वच्छ पाणी आणि स्वच्छ धुतलेले फडके वापरा.